# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १३ मार्च, २०१३.
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना -(असल्यास).**

**तीन : लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये)-**

**(मंगळवार, दिनांक १२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना) (क्रमांक - १)**

**(१) श्री. संजय दत्त, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री. चरणसिंग सप्रा, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती अलका देसाई, श्री. सुभाष चव्हाण, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. जयवंतराव जाधव, विक्रम काळे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. किरण पावसकर, अनिल भोसले, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.अपूर्व हिरे, सर्वश्री. प्रकाश बिनसाळे, नरेंद्र पाटील, राणा जगजितसिंह पाटील, दिपकराव साळुंखे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"गॅस सिलिंडरपासून शाळेतील प्रवेशापर्यंत सर्वत्र आधार कार्डाची असलेली सक्ती, निवृत्तीवेतनासाठी, भविष्य निर्वाह निधीसाठी, तसेच, विद्यापीठांमधील शिष्यवृत्तीधारकांसाठी आवश्यक होणार असणे, आधार कार्ड नोंदणीसाठी राज्यशासनाने मोहिम राबविली असली तरी अपुरी नोंदणी केंद्रे, आवश्यक यंत्रांची कमतरता, काही ठिकाणी अननुभवी कर्मचारी, नोंदणी नंतर चार ते सहा महिन्यांची प्रतिक्षा, चौकशीसाठी दिलेला फोन क्रमांक कायम व्यस्त असणे, केंद्रात गेल्यावरही आवश्यक माहिती न मिळणे, कर्मचाऱ्यांचा उर्मटपणा, जेष्ठ नागरिक व अपंग व्यक्तींना आधार कार्ड काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात समस्या येणे, जनजागृतीअभावी विभागात आधारकार्ड नोंदणी केंद्र कुठे आहे याचीच माहिती अनेकांना नसणे, अनेक तास रांगेत उभे राहूनही योग्य ती कागदपत्र नसल्याने अनेकांना परत जावे लागणे, राज्यात आतापर्यंत

झालेल्या ३.८६ कोटी नोंदणीपैकी सव्वापाच लाख कार्ड केवळ पत्ता सापडत नसल्याने पोस्टाने परत गेली असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

(२) **सर्वश्री. मोहन जोशी, संजय दत्त, सुभाष चव्हाण, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"पुणे शहराला अनियमित दाबाने पाणीपुरवठा होत असतानाच या विभागाकडून पाणीवाटपात हलगर्जीपणा केला जात असल्याची धक्कादायक माहिती माहे २५ फेब्रुवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, सिंहगड रस्ता परिसरातील नागरीकांना पाणीपुरवठा व्हावा यासाठी तुकाईनगर येथे पाण्याची टाकी बसविण्यात आली असणे, या टाकीतून अजिंक्यनगर, विश्रांतीनगर आणि नवशा मारुती या परिसरातील जवळपास ४० ते ५० हजार नागरीकांना बंद पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा केला जात असणे, परंतु सदरहू पाईपलाईनमध्ये गेल्या काही दिवसांपासून दगडगोटे आणि फुटलेल्या बादल्या आढळून येणे, तसेच पाईपलाईनचा मोठा भाग फुटलेल्या अवस्थेतच असणे, यामुळे नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणे, परिणामी परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्रीमती शोभाताई फडणवीस, दिप्ती चवधरी, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री. संजय दत्त, सुभाष चव्हाण, अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे, सतीश चव्हाण, डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. अपूर्व हिरे, श्री.विजय गिरकर, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री.विनोद तावडे, नितीन गडकरी, मोहन जोशी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यात वर्षाकाठी सरासरी किमान आठ हजारापेक्षा अधिक मुली व महिला बेपत्ता होण्याच्या घटना घडत असून त्यातील अर्ध्याच प्रकरणांचा छडा लागत असणे, सन २००९ मध्ये ६,७५८ मुली हरविल्याची नोंद असून त्यापैकी केवळ ५,२२३ मुली सापडणे, सन २०१० मध्ये ७,५६६ मुली व महिला बेपत्ता तर ५,२८३ मुली सापडणे, सन २०११ मध्ये बेपत्ता झालेल्या ८,३४५ मुलींपैकी केवळ ५,७०७ मुली सापडल्या असून राज्यात शाळकरी व महाविद्यालयीन मुला-मुलींचे अपहरण करुन त्यांची विक्री करुन त्यांना वाम मार्गाला लावणारी टोळी सक्रिय असणे, तसेच लग्नाचे अमिष देऊनही या मुलींची विक्री होत असल्याचे काही घटनांमधून निदर्शनास येणे, या घटनांमध्ये होत असलेली वाढ, परिणामी पालकांमध्ये निर्माण झालेले भितीचे व घबराटीचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(४) **डॉ. अपूर्व हिरे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **आदिवासी**

**विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यातील आदिवासी पट्ट्यातील रोहड गांवात शासकीय आश्रमशाळेतील दोन विद्यार्थ्यांचा दिनांक ९ फेब्रुवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास विहीरीत बुडून दुर्देवीरित्या झालेला मृत्यू, शासकीय आश्रमशाळांत पहारेकरी, शिक्षक अधिक्षक व स्त्री-अधिक्षिका यांची मोठ्या संख्येने रिक्त असलेली पदे, आदिवासी विकास विभागांतर्गत नियमीत कर्मचाऱ्यांची भरती न करणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांमुळे आश्रमशाळांची गुणवत्ता ढासळणे, खाजगी अनुदानित आश्रमशाळांचे तुलनेत, शासकीय आश्रमशाळेत वाढीव पदे व भरीव खर्चाची तरतुद असूनही शासकीय आश्रमशाळांची गुणवत्ता ढासळणे, शासकीय आश्रमशाळांना हजारो रुपयांचे इमारत भाडे अदा करुनही इमारतीत सोयी, सुविधा, पिण्याचे शुध्द पाणी नसणे, स्वच्छतेअभावी विषबाधेचे प्रकार घडणे, शासकीय आश्रमशाळांच्या एकूणच समस्यांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे जनतेत व्यक्त होत असलेला संताप, या प्रश्नी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री. अनिल भोसले, जयवंतराव जाधव, किरण पावसकर, नागो गाणार, भगवान साळुंखे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री. दिपकराव साळुंखे, विक्रम काळे वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील विविध ग्रंथालयामध्ये हजारो कर्मचारी कार्यरत असणे, राज्य शासनाने सध्याचे वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून जाहीर करणे, राज्यातील ग्रंथालयाला जे अनुदान देण्यात येते ते फार तुटपुंजे असणे, याबाबत या कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी मोर्चे काढूनही त्यांच्या पदरी निराशा कायम असणे, मा.अर्थमंत्र्यांनी बजेटमध्ये ग्रंथालयाला विशेष वाढ देऊ अशी घोषणा करुनही कोणतीही वाढ अद्याप न देणे, अ वर्ग व ब वर्ग वाचनालयातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी आणि क व ड वर्गातील कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळावे यासारख्या प्रामुख्याने मागण्या असणे, मात्र या मागण्यांकडे राज्य शासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष होत असणे, यामुळे ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांमध्ये शासनाविरोधी पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, याकडे शासनाचे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **डॉ. नीलम गोऱ्हे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"पुणे शहरात वातावरणाच्या बदलामुळे स्वाईन फ्ल्युचा प्रसार वाढण्यास पुन्हा सुरुवात होणे,

माहे फेब्रुवारी, २०१३ च्या सुमारास शहरातील विविध रुग्णालयात ९ रुग्ण उपचार घेत असून त्यातील तिघांची प्रकृती अत्यावस्था होणे, अवसरी येथे एकाचा मृत्यू होणे, परिणामी शहरातील नागरिकांमध्ये पसरलेले भितीचे व घबराटीचे वातावरण, शासनाने स्वाईन फ्ल्यूचा प्रसार रोखण्याकरिता आवश्यकती उपाययोजना तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**चार : विशेष उल्लेख (असल्यास).**

## मध्यंतर

**पाच : (मंगळवार, दिनांक १२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव - चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर )**

**सर्वश्री.विनोद तावडे,** दिपकराव साळुंखे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, रामदास कदम, जयंत पाटील, राणा जगजितसिंह पाटील, सुभाष चव्हाण, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, सतिश चव्हाण, एम.एम.शेख, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.रमेश शेंडगे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री.संदिप बाजोरिया, जयप्रकाश छाजेड, रामनाथ मोते, विनायक मेटे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंवतराव जाधव, किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.कपिल पाटील **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

" राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती, राज्यातील १२००० गावे दुष्काळाच्या छायेत असणे, १९७२ च्या दुष्काळापेक्षा यावेळची दुष्काळी परिस्थिती भयानक असणे, ग्लोबल वॉर्मिंगमुळे प्रत्येक दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षी दुष्काळ पडण्याची शक्यता अधिक गडद होत असल्याने दुष्काळ निर्मूलनासाठी कायम स्वरुपी उपाययोजना करण्याची आवश्यकता, बॅंकेकडून व खाजगी सावकाराकडून कर्ज काढून शेतकऱ्यांनी पेरणी करणे, राज्यातील बऱ्याच भागात पावसाअभावी शेतीमालाच्या उत्पादनात झालेली घट, त्यामुळे शेतकरी हवालदिल होणे, राज्यात उद्भवलेली तीव्र पाणी टंचाई, काही भागात १० दिवसातून एकदा पाणी पुरवठा करण्यात येणे, सध्या १२०५ गावातील ३७८९ वाड्यांना सुमारे २००० च्यावर टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणे, ही संख्या वाढण्याची निर्माण झालेली परिस्थिती, हंडाभर पाण्यासाठी महिला व लहान मुले वणवण भटकत असणे, मात्र मिनरल वॉटर मुबलक प्रमाणात उपलब्ध

असणे, केंद्र शासनाची असलेली आरआरआर ही योजना प्रभावीपणे राज्यात राबविण्याची आवश्यकता, पाणी व चाऱ्या अभावी जनावरांचे होत असलेले हाल, शेतकऱ्यांना स्वतःची जनावरे अत्यल्प किंमतीत बाहेरील राज्यात विकावे लागणे, राज्यात ४२० चारा छावण्या असणे, सर्वाधिक छावण्या अहमदनगर, सोलापूर व सातारा जिल्ह्यात असूनही त्या अपुऱ्या असणे, बीड जिल्ह्यात बीड व आष्टी व्यतिरिक्त गेवराई तालुक्यात त्याचप्रमाणे, जळगाव व नाशिक जिल्ह्यात मागणी असूनही तेथे चारा छावण्या उभारण्यात न येणे, चारा छावण्या उभारण्याच्या निकषात बदल करण्याची आवश्यकता, शेळया व मेंढ्यांसाठी राज्यात एकही चारा छावणी नसणे, वन्यप्राण्यांसाठी जंगलात सिमेंटच्या टाक्या बांधून त्यात टँकरने पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता, दुष्काळग्रस्त भागातील लोकांना रोजगार हमी योजनांची कामे मिळत नसल्यामुळे ते मुंबई, ठाणे व पुणे या भागात स्थलांतरीत होणे, रोजगार हमी योजनांची कामे मोठ्या प्रमाणात सुरु करण्याची त्याचप्रमाणे भविष्यकालीन उपाययोजनांवर भर देण्याची नितांत आवश्यकता, फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यांच्यासाठी स्वतंत्र पॅकेज देण्याची होत असलेली मागणी, शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीस स्थगिती देण्याचा व वीज बिलात सवलत देण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, या भीषण दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी त्याचप्रमाणे पाणी टंचाईवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेवून दुष्काळग्रस्त भागातील नागरीकांना तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

**सहा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा तालुक्यात लक्कडकोट गूडा येथे ७० वर्षापूर्वी सर्व्हे नं. ९२ मध्ये ३०० लोकवस्ती असलेले पारधी समाज वसलेले असून, त्यांना कुळकायद्यातून मारवाडी तुकाराम राजकोंडावर यांच्या १७ एकर जमिनीचा मालकीहक्क श्री. आबाजी देशमूख शेरेकर यांना बहाल होणे, व त्यावर गावातील कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असणे, परंतू सदर जमिन आदिवासींना कुळकायद्यात मिळाली असून तेथील श्री. राजकोंडावार यांचे नातू बाप- दादाची जमीन आहे म्हणून सदर जमिन विकण्याचा सौदा करुन ती जमिन ६० लाखात विकण्यात येणे, दिनांक २९ जुलै, २०११ रोजी राजूरा तहसिल कार्यालयातील उपनिबंधक कार्यालय येथे

विक्रीपत्र करण्यात येणे, परंतू आदिवासी कुळकायद्यात मिळालेल्या जमिनीची विक्री होत नसतांना झालेला गैररित्या व्यवहार, त्यामुळे आदिवासीना हक्कापासून वंचित होण्याची आलेली वेळ, शासनाने गैररित्या होणाऱ्या विक्री प्रकरणी कारवाई करण्याची आवश्यकता. "

(२) **श्री.रामनाथ मोते, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"शासनमान्य खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, माध्यमिक आश्रमशाळा अध्यापक विद्यालये, तंत्र माध्यमिक विद्यालयांना १९८१ ची महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियमावली लागू असणे, नियम १६ अन्वये महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेची तरतूद असणे, १ वर्षापेक्षा कमी सेवा असल्यास प्रसूती रजा बिनपगारी देय असणे, १ वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या सेवेनंतर वेतनासह रजा देय असणे, १ वर्षाच्या सेवेनंतर प्रसूती रजा ही महिलांची हक्काची रजा असणे, शिक्षण सेवकांनाही प्रसूती रजेचे नियम नियमित महिला कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू असणे, १ वर्षापेक्षा अधिक सेवा असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना शिक्षण सेवक कालावधी प्रसूती रजेइतका शिक्षण सेवक कालावधी वाढविण्याचा निर्णय घेणे, महिला कर्मचाऱ्यांचा देय रजेचा कालावधी अर्हताकारी सेवा न धरणे महिला कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १२ मार्च, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.